महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ अमरावती

**जाहीरात क्र २/२०१६ अंतर्गत तंत्रज्ञ श्रेणी-४ पदावर नेमणूक करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची तात्पुरती पुरवणी निवड यादी / प्रतिक्षा यादी.**

महापारेषण कंपनीच्या अमरावती परिमंडल कार्यालयाने प्रसारित केलेल्या जाहीरात क्र २/२०१६ अन्वये तंत्रज्ञ श्रेणी-४ पदासाठी दि. २७.०८.२०१७ रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाईन लेखी परिक्षेत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे तसेच जाहीरातीत देण्यात आलेली तंत्रज्ञ श्रेणी-४ पदाची उपलब्ध संख्या व सामाजिक आरक्षण वगैरे बाबी विचारात घेऊन तात्पुरते पात्र ठरलेल्या उमेदवारांची तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदाची तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादा ही काही अटी व शर्तीच्या अधीन राहून दि. १०.१०.२०१७ रोजीच्या सुचनापत्राद्वारे प्रकाशीत करण्यात आलेली होती.

१. त्या अनुषंगाने तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांना प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणी करीता बोलावून त्यांच्या कागदपत्रांची प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आली आहे कागदपत्र पडताळणीस तात्पुरत्या निवड/ प्रतिक्षा यादीतील इमाव (महिला) प्रवर्गातील एक उमेदवार कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्यामुळे दि. १०.१०.२०१७ रोजीच्या सुचनापत्रातील अट क्र ६ नुसार सुधारित यादी प्रकाशीत करण्यात येत आहे.
२. सुधारीत यादीतील निवड ही उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेत मिळालेल्या गुणानुसार तसेच उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेल्या इतर माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेली माहिती मूळ प्रमाणपत्राच्या / कागदपत्रांची पडताळणी वेळी तपासण्यात येईल.
३. सुधारीत यादीत निवड करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणीक अर्हता , अनुभव , वय , मागास प्रवर्ग उन्नत प्रगत गटात मोडत नसणे , अधिवास प्रमाणपत्र इ. बाबतचे सर्व मुळ प्रमाणपत्रे , कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवारांची निवड रदद करण्यात येईल.
४. सुधारीत निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणुन नेमणूक मिळण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी . ही निवडयादी पुर्णतः जाहीराती मध्ये नमुद केलेली शैक्षणीक अर्हता आणी इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आली आहे.
५. तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करित नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींची किंवा जाहीरातीमधील कोणत्याही अटींचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्पयावर रदद करण्यात येईल.
६. उमेदवारांजवळ असलेली पात्रता व सर्व आवश्यक कागदपत्रे ही जाहीरातीस नमुद केलेल्या दिनांका पर्यत धारण/ प्राप्त केलेले असणे व वैध असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी ज्या उमेदवारांनी आवश्यक पात्रता व कागदपत्रे ही जाहिरातीच्या शेवटच्या दिनांका पर्यत धारण / प्राप्त केलेली नसतील व वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी रदद करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल महापारेषण कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही.

७. तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदाच्या तात्पुरत्या सुधारित निवड यादीतील उमेदवार हे कागदपत्र पडताळणीत अपात्र आढळून आल्यास प्रतिक्षा यादी कार्यान्वीत करण्यात येऊन त्या यादीतील उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल सदर प्रतिक्षा यादीतील उमेदवार सुध्दा पात्रता व कागदपत्रे पडताळणीत अपात्र ठरल्यास त्या खालील गुणवत्ता धारक उमेदवारांची स्वतंत्र निवड / प्रतिक्षा यादी लावण्याचे अधिकार महापारेषण कंपनी राखून ठेवत आहे.

८. तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदाची सुधारीत निवड / प्रतिक्षा यादी घोषित करतांना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे तथापि अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करुन योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार महापारेषण कपंनीने राखून ठेवलेला आहे.

९. तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदाच्या सुधारीत निवड / प्रतिक्षा यादीत समावेश असलेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी उमेदवारांनी खालील पत्यावर दि. २०.०३.२०१८ रोजी १०.०० ते ५.३० या वेळेत हजर राहावे.

**पत्ता :-- मुख्य अभियंता ,**
**अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ ,**
**जुने पॉवर हॉउस परिसर, डफरिन हॉस्पीटल रोड**
**अमरावती - ४४४ ६०१**

१०. सदर सुधारीत निवड / प्रतिक्षा यादी ही दिनांक १०.१०.२०१७ पासुन १ वर्षा करिता वैध राहील

११. तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदाची पुरवणी निवड / प्रतिक्षा यादी क्र १ खालील प्रमाणे

**Select List**

| Sr. No. | Roll No | Name of the candidate | Category | Remarks |
|---|---|---|---|---|
| 01 | 1230701024 | Snehal Vijayrao There | OBC | Selected against WR |

**Wait List**

| Sr. No. | Roll No | Name of the candidate | Category | Remarks |
|---|---|---|---|---|
| 01 | 1230701006 | Shilpa Vinayak Ambalekar | OBC | Selected against WR |

सदर निकाल रिट याचीका क्र ४५६१/२०१६ बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. ०५.१०.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने जाहीर करण्यात आलेला आहे.

दि. १५.०३.२०१८

सही /-
मुख्य अभियंता
अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ
अमरावती